महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
अतिउच्चदाब(संवसु) विभाग,सोलापूर.
सीआयएन नं.यु ४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४६

| | |
|---|---|
| ऑफीसचे नांव : | कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,म.रा.वि.पारेषण कंपनी, मर्यादित, |
| ऑफीसचा पत्ता: | प्रशासकीय इमारत २२० के.व्ही. बाळे उपकेंद्र आवार अंबिकानगर बार्शीरोड बाळे. सोलापूर.,जिल्हा-सोलापूर. बाळे ४१३२५५.(महाराष्ट्र) |
| संपर्क नं .(दूरध्वनी) ☎ | ०२१७ (वै) २३५०६७३ /०२१७(का) २३५१८२७ |
| फॅक्स- | ०२१७.२३५१८२७ |
| Email Address: | ee6210@mahatransco.in |
| Website: | wwwmahatransco.in |


जा.क्र:- काअ/अऊदा/(संवसु)/वि/सोला./मासं/८/No 01692 दिनांक:-23 DEC 2019

## जाहीर सुचना

आय.टि.आय.शिकाऊ उमेदवार म्हणून भरती प्रक्रिया २०१९-२०२० करिता महापारेषण अउदा संवसु विभाग सोलापूर अंतर्गत यांच्या आस्थापनेवरील विजतंत्री (Electrician) या प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवार पदाच्या एकुण ६३ जागा भरण्यासाठी दि. ०३.०१.२०२० पर्यंत २३:५९ वाजेपर्यंत **WWW.apprenticeship.gov.in** या संकेत स्थळावर अउदा संवसु विभाग सोलापूर अंतर्गत खालील आस्थापना रजिस्ट्रेशन क्रमांकावर ऑनलाईन (Online) अर्ज मागविण्यात येत आहेत. पदाचा ट्रेड हा विजतंत्री (Electrician) करीता शिकाऊ उमेदवाराचा कालावधी हा १ वर्षाकरीता असून जागा खालील प्रमाणे आहेत.

| रजिस्ट्रेशन क्रमांक | विजतंत्री (Electrician) | एकुण जागा |
|---|---|---|
| E-09162701690 | ६३ | ६३ |

१. शैक्षणिक अर्हता :- महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
२. विद्यावेतन नियमाप्रमाणे लागु राहील.
३. पद कमी जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापनाकडे राखीव असतील व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.
४. एस.एस.सी उत्तीर्ण गुणपत्रिका व आयटिआय गुणपत्रिका या प्रमाणपत्राची प्रत आधारकार्डच्या नावाशी सुसंगत असलेली माहिती भरावी.
५. एसएससी गुणपत्रक, प्रमाणपत्रक, तसेच आय.टि.आय.उत्तीर्ण प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत चार सेमिस्टर (गुणपत्रिका / वार्षिक गुणपत्रिका) अपलोड करणे आवशक आहे.
६. शिकाऊ उमेदवाराची सही, पालकांची सही, प्रवर्ग, जन्म तारिख, एसएससी मार्क, आयटीआय मार्क, ही माहिती अचुक भरण्यात यावी.अन्यथा सदर उमेदवाराचा विचार केला जाणार नाही.
७. भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिकाऱ्याकडुन दबाव आणल्यास आपली उमेदवारी रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
८. उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करताना पोर्टलवर आवश्यक मुळ प्रमाणपत्र स्कॅन करुन योग्य रितीने अपलोड करणे बंधनकारक आहे. तसेच एसएससी गुणपत्रीका आयटीआय गुणपत्रीका पालकाची स्वाक्षरी, फोटो,प्रवर्ग इत्यादी माहिती आपलोड केल्या शिवाय उमेदवाराचा विचार केला जाणार नाही. वरील कालावधीत ऑनलाईन (Online) अर्ज सादर न केल्यास अशा अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.
९. वयोमर्यादा १८ ते ३८ वर्षे वर्ष.(मागासवर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथिलक्षम).
१०.ऑनलाईन (Online) अर्ज सादर करतांना उमेदवाराने सद्यस्थितीत कार्यान्वित (E-Mail Id) व कार्यान्वित मोबाईल नंबर नोंदविणे आवश्यक राहील. ई-मेल व भ्रमणध्वनीवर संपर्क न झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
११.दि.०३.०१.२०२० नंतर नोंदणी केलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
१२.आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांस या कार्यालयाने वेळोवेळी शासकीय नियमाप्रमाणे आरक्षणासंबधीत कागदपत्राची मागणी केल्यास ते सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.
१३.प्रणाली मध्ये बदल झाल्यामुळे या आधी ज्या उमेदवारानी वरील रजिस्ट्रेशन क्रमांकावर ऑनलाईन (Online) अर्ज सादर केले असेल त्यांनी पुन्हा अर्ज सादर करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

(आर.टी.शेळके)
कार्यकारी अभियंता
अउदा संवसु विभाग सोलापूर.